नलिनी उर्फ तारा हर्षल महाडिक
वि.
हर्षल प्रकाश महाडिक

## फौजदारी किरकोळ अर्ज.क्र.१६३/२०२२ मधील निशाणी क्र. ०५ खालील आदेश

( दि. २५/०४/२०२३ रोजी पारित केला )

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे कलम १९ खाली निवासी आदेश व कलम २० खाली आर्थिक सहाय्य असे अंतरिम आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार असे कथन करते की, सामनेवाला हा तिचा पती आहे. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि. २९/०१/२००७ रोजी वरद विनायक मंदिर, महड, ता. खालापुर जि. रायगड येथे झालेला आहे. त्या विवाह बंधनातून त्यांना अर्जदार क्र.२ कु.गार्गी या मुलीचा जन्म झालेला आहे.

०३. अर्जदारचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला याने तिचा कौटुंबिक, शारिरीक, मानसिक आणि आर्थिक छळ केलेला आहे. त्यामुळे ती मुलीसह तिच्या माहेरी वडीलांच्याकडे राहत आहे. तिचे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून ती तिच्या वडीलांवर अवलंबून आहे. त्याउलट सामनेवाला हा खोपोली येथील शिशु मंदीर शाळेमध्ये शिक्षक असून त्याला दरमहा पन्नास ते साठ हजार एवढा पगार आहे. परंतु तरी देखील तो त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी नाकारत आहे.

०४. अर्जदारचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला याने तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्यामुळे ती सतत आजारी व मानसिक तणावाखाली असते. त्यामुळे ती कोणताही कामधंदा करुन उत्पन्न मिळवू शकत नाही. सबब तिने प्रस्तुतचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे कलम १९ खाली निवासी आदेश व कलम २० खाली आर्थिक सहाय्य असे अंतरिम आदेश

मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०५. सामनेवाला याने निशाणी क्र. १५ अन्वये प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन तो आव्हानित केलेला आहे. त्यामध्ये त्याने असे कथन केले आहे की, अर्जदारने कोणत्याही कारणाशिवाय त्याचा त्याग केलेला आहे व ती तिच्या माहेरी स्वईच्छेने राहत आहे. त्याने अर्जदारचा मानसिक, शारिरीक अथवा आर्थिक छळ केल्याची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. त्याचे असे कथन आहे की, अर्जदार ही तरुण मुलांसोबत फिरायला जात होती व त्यांच्यासोबत अश्लील गोष्टी करीत होती.

०६. त्याचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारनेच त्याला मानसिक व शारिरीक त्रास दिलेला आहे. तो अर्जदारला नांदवायला तयार आहे. त्याचे पुढे असे कथन आहे की, तो शिशु मंदिर या इंग्रजी शाळेमध्ये नोकरी करीत असून त्याला दरमहा रक्कम रु.१७,०९२/- एवढा पगार आहे. त्याच्यावर त्याच्या वयोवृद्ध आई-वडीलांच्या उदरनिर्वाहाची व औषधोपचाराची जबाबदारी आहे. त्याउलट अर्जदार ही ब्युटीपार्लरचा व्यवसाय करते. त्यातून तिला पुरेसे उत्पन्न मिळते. त्याशिवाय त्यांची चिंचवली येथील संयुक्तीक मालकीची सदनिका अर्जदारने भाड्याने दिलेली असून त्याचे दरमहा भाडे रक्कम रु.६,०००/- तिला मिळते. त्यामुळे त्याने अर्जदार हिला कोणत्याही अंतरिम पोटगीची आवश्यकता नसल्याचे कथन केलेले आहे व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०७. उभयपक्षांची परस्पर विरोधी कथने लक्षात घेता खालीलप्रमाणे मुद्दे निश्चितीकरणासाठी उपस्थीत होत आहेत. त्यावरील निष्कर्ष मी अनुमान काढून कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | सामनेवाला याने अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी दिसते काय? | **होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ०२. | सामनेवाला याच्याकडुन अंतरिम आर्थिक सहाय्य मिळणेस अर्जदार पात्र आहे काय? असल्यास किती? | **होकारार्थी. सामनेवाला याच्याकडून अर्जदार एकत्रीत दरमहा रक्कम रु. ४,०००/- मिळण्यास पात्र आहेत.** |
| ०३. | अर्जदार हिने मागणी केलेले इतर अंतरिम आदेश ती मिळण्यास पात्र आहे का ? | **नकारार्थी.** |
| ०४. | काय आदेश ? | **अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

०८. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. उभय पक्षकारांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ बरीचशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. आवश्यक त्या कागदपत्रांचा उल्लेख मी माझ्या कारणमीमांसेमध्ये करीत आहे.

### मुद्दा क्र.१ व २ करीताः-

०९. मुद्दा क्र. १ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्याने कथनांची पुर्नःवृत्ती टाळण्याकरीता सदरचे मुद्दे एकत्रित चर्चेस घेतलेले आहेत. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि. २९/०१/२००७ रोजी झालेला असल्याचे उभय पक्षकारांना मान्य आहे. त्या विवाह बंधनातून त्यांना कु.गार्गी ही मुलगी असल्याची बाब वादांकित नाही. सबब, अर्जदार व सामनेवाला यांच्यामध्ये कौटुंबिक नातेसंबंध (Domestic Relation) असल्याचे सिध्द होत आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही हे पाहण्यासाठी अर्जातील व म्हणण्यातील कथने अभिलेखावर आहेत. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्याच्या मुळ हेतूचा विचार करावयाचा झाल्यास तो हेतु सामनेवाला याच्या कथनांपेक्षा अधिक महत्वाचा आहे असे मला वाटते.

अर्जदार हिने अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र देऊन शपथेवर तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सांगितलेले आहे. त्यामध्ये तिने सामनेवाला याने तिचा मानसिक व शारिरीक छळ केल्याचे कथन केले आहे. एखादी स्त्री विनाकारण तिच्या पतीविरुद्ध हिंसाचार झाल्याबाबतची खोटी कथने करेल असे प्रथमदर्शनी मला वाटत नाही. त्यामुळे, प्रथमदर्शनी तरी अर्जातील कथने ही सत्य आहेत असे दिसते. अर्जातील नमुद कृत्ये ही कौटुंबिक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडत आहेत, त्यामुळे प्रथमदर्शनी सामनेवाला याने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसत आहे.

११. अर्जदारने सदर कायद्याचे कलम २३ अंतर्गत आर्थिक सहाय्य व निवासी आदेश मिळण्याची विनंती केलेली आहे. सदर कलमाखाली एखाद्या अर्जावरुन असे उघड होत असेल की, उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराची कृती करीत आहे किंवा त्याने तशी कृती केली आहे किंवा उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराची कृती करील अशी शक्यता आहे याबाबत दंडाधिका-याचे समाधान झाले असेल तर, त्याला बाधित व्यक्तिच्या शपथपत्राच्या आधारावर, उत्तरवादीविरुध्द सदर कायद्याचे कलम १८ ते २२ अन्वये अंतरिम आदेश देण्याचे अधिकार आहेत. यापुर्वीच्या परिच्छेदामध्ये प्रथमदर्शनी अर्जदारने प्रतिज्ञापत्राव्दारे सामनेवाला याची कृती कौटुंबिक हिंसाचार असल्याचे सिध्द केलेले आहे. त्यामुळे, आता ही बाब पाहणे गरजेचे आहे की, अर्जदार कलम २३ अंतर्गत अंतरिम स्वरुपात आर्थिक साहाय्य मिळण्यास पात्र आहे का ?

१२. अर्जदारचे असे कथन आहे की, तिचे कोणतेही उदरनिर्वाहाचे साधन नाही. ती तिच्या माहेरच्या लोकांवर अवलंबून आहे. त्याउलट समानेवाला हा शिशु मंदिर या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून नोकरीला असून त्याला मासिक पन्नास ते साठ हजार एवढे उत्पन्न असल्याचे कथन केलेले आहे. सामनेवाला याने तो शिशु मंदिर या शाळेमध्ये शिक्षक म्हणून नोकरीला असल्याची बाब नाकारलेली नाही. परंतु त्याने त्याला मासिक १३,०००/- पगार असल्याचे कथन मालमत्ता आणि दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये केलेले आहे. त्यावरुन त्याच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असल्याचे स्पष्ट होते. त्याने जरी त्याच्या खर्चाचा तपशिल प्रतिज्ञापत्रामध्ये दिलेला असला, तरी देखील

त्या कारणावरुन तो अर्जदार व मुलगी गार्गी यांची जबाबदारी नाकारु शकत नाही. अर्जदार हिला चिंचवली शेकीन येथील सदनिकेचे दरमहा भाडे मिळत असल्याची बाब वादांकित नाही. परंतु अर्जदारच्या कथनानुसार तिला दरमहा ४,०००/- एवढे भाडे मिळते, त्याउलट सामनेवाला याच्या कथनानुसार अर्जदारला दरमहा रु.६,०००/- एवढे भाडे मिळते. परंतु त्याबाबतचा कोणताही पुरावा पटलावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे जरी अर्जदारला दरमहा रक्कम रु.६,०००/- एवढे भाडे मिळत असल्याचे गृहित धरले, तरीदेखील ते तिच्यासाठी आणि मुलीसाठी पुरेसे असल्याचे सामनेवाला याचे कथन नाही. त्यामुळे, ही बाब स्पष्ट होते की, अर्जदार हिच्याकडे स्वतःचा व मुलीचा उदरनिर्वाह करण्यास पुरेसे साधन नाही. सामनेवाला हा अर्जदारचा पती असल्यामुळे, तिच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करण्याची त्याची नैतिक जबाबदारी आहे. तसेच, सामनेवाला याला मासिक उत्पन्न मिळत असल्याची बाब वादांकीत नाही. त्यामुळे, अर्जदार, सामनेवाला याच्याकडून मासिक निर्वाह भत्त्याची रक्कम अंतरिम स्वरुपात मिळण्यास पात्र आहे.

१३. अर्जदार हिने दरमहा रक्कम रु. २०,०००/- अंतरिम आर्थिक सहाय्याची मागणी केली आहे. सदर कायद्याचे कलम २० मध्ये नमुद केल्याप्रमाणे आर्थिक मदत ही पुरेशी, न्याय्य, योग्य व पिडीत व्यक्तीचे राहणीमानाशी सुसंगत असणे बंधनकारक आहे. अर्जदार हिला स्वतःच्या किमान दैनंदिन गरजा, औषधोपचार, आणि मुलीचा दैनंदिन पोषण आहार, शिक्षण खर्च इ. साठी आर्थिक सहाय्याची गरज असल्याचे दिसत आहे. त्यामुळे अर्जदार व तिच्या मुलीचा राहणीमनाचा विचार करिता दरमहा रक्कम रुपये ४,०००/- एकत्रीत पोटगी पुरेशी ठरेल असे मला वाटते. त्यामुळे, अर्जदार, सामनेवाला याच्याकडून दरमहा एकत्रीत रक्कम रु.४,०००/- आर्थिक साहाय्य मिळण्यास पात्र आहे. सदरची रक्कम अर्ज दाखल तारखेपासून देय राहील. वरील कारणांमुळे मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष त्या अनुषंगाने नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीताः–</u>**

१४. अर्जदारने, घरभाडेपोटी रकमेची मागणी केलेली आहे. परंतु ती तिच्या

माहेरच्या घरामध्ये राहत असल्याची बाब वादांकित नाही. तसेच तिने त्यांच्या सामाईक चिंचवली शेकीन येथील घरामध्ये राहण्याची परवानगी मागितलेली नाही. त्यामुळे ती निवासाचे अंतरीम आदेश मिळण्यास पात्र नाही. सबब मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष "नकारार्थी" नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीताः–**

**१५.** मुद्दे क्र.१ ते ३ मध्ये केलेल्या सविस्तर कारणमीमांसेच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

**:–आदेश–:**

| | |
|---|---|
| **०१.** | अर्ज (निशाणी क्र. ५) अंशतः मंजुर करणेत येत आहे. |
| **०२.** | अर्ज दाखल तारखेपासून अंतिम आदेशापावेतो पोटगीची रक्कम म्हणून सामनेवाला याने अर्जदार व मुलीला एकत्रीत दरमहा रक्कम रु. ४,०००/- (अक्षरी रुपये चार हजार मात्र) द्यावेत. |
| **०३.** | सदर आदेशाची प्रत विनामुल्य उभय पक्षकारांना देण्यात यावी. |
| **०४.** | खर्चाबाबतचे आदेश मुळ अर्जातील अंतिम आदेशाप्रमाणे. |

**(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2023.04.25 17:43:17 +0530

दिनांकः २५/०४/२०२३.
खालापूर.

**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, खालापूर.